
# श्रीदेव वेतोबा स्तवन–मुक्तावली



श्रीदेव वेतोबा, आजगांव

— सद्गुरू प्रभु विरचित

[किंमत २ रुपये ]

[ १९८७

# आमची पुस्तके

(१) **वा. रा. ढवळे, व्यक्ति आणि कार्य** गुं. फ. आजगांवकर,

(२) **नटवर्य माधवराव वालावलकर** संपादन गुं. फ. आजगांवकर किं. २५ रु.

(३) **प्राचीन मराठी संतकवी** भाग २ व ३ लेखक : महाराष्ट्र-भाषा भूषण ज. र. आजगांवकर पृष्ठे १००० किंमत ६० रु. संपादन :—गुं. फ. आजगांवकर

(४) **माऊली कृपेची साऊली** ले. सद्गुरू प्रभु किं. ६ रु.

(५) **क्रांति–पराग** प्रस्तावना-**सदानंद रेगे** कवि-प्रभु गुंफराज

(६) **भाव माझ्या अंतरीचे** (काव्यसंग्रह) कवि-सद्गुरू प्रभु

(७) **आत्मसंवाद** सद्गुरू प्रभू किं. ४ रु.

(८) **भारतांतील शास्त्रांचा उद्गम व विकास** ले. डॉ. पंढरीनाथ

(९) **आजगांव दर्शन** : गुं. फ. आजगांवकर

(१०) **कुडाळ देशकर** खंड १ ते ३ गुं. फ. आजगांवकर

(११) **वालावल दर्शन** ले : गुं. फ.

(१२) **चिदानंद लहरी** संपादन—गुं. फ. आजगांवर

(१३) **प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी** : ले. ज. र. आजगांवकर संपादन : गुं. फ. आजगांवकर

(१४) **सेनापति भोसले** : ले. गुं. फ. आजगावकर

(१५) **'जय महाराष्ट्र'** : ले. न. शे. पोहनेरकर, सं. गुं. फ.

(१६) **व्यक्ति व कार्य** कॅप्टन मा. कृ. शिंदे,

(१७) **वासुदेवानंद सरस्वति** : दत्तावतार टेंबेस्वामी यांचे चरित्र : सद्गुरु प्रभू

(१८) **नामामृत सार** : सद्गुरू प्रभू

(१९) **सोहं ध्यान तरंग** : सद्गुरू प्रभू

**पत्ता : गुं. फ. आजगांवकर** १७ के. जी. बी. निवास
मॅजेस्टिक समोर गिरगांव, मुंबई ४

प्रकाशक : **गुं. फ. आजगांवकर** १७ के. जी. बी. निवास गिरगांव मुं. ४

मुद्रक : **शरद कृ. सापळे** रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस ३१ त्रिभुवन रोड मुं. ४

# प्रास्ताविक

आजगांव हा एक प्राचीन समृद्ध गांव आहे. अज्ज–ग्राम म्हणजे आर्यांचा गांव. त्याला आद्यग्राम म्हणजे मूळ वसाहतीचा गांव असें म्हणतात. कुडाळ प्रांतावरील कुडाळ देशकर गौड ब्राह्मणांच्या देशसत्तेंतील व ग्रामसत्तेंतील जे मूळ भुंकेचे अठरा गांव आहेत त्यांत आजगांवचा समावेश होतो. आजगांव हा तर्फ म्हणजे तालुका होता. प्रभु मतकरी हे भारद्वाज गोत्री गौड ब्राह्मण ह्या तर्फेचे प्रमुख होते. कुडाळच्या सरदेसकींत त्यांना दोन जागा मिळाल्या होत्या. ह्या आजगांव तर्फेत पुढील गांव येत. आजगांव, तिरवडें, आसोली नाणोस, गुळदुवें आरवंदें, तळवणे, किनळें, आरवली, शिरोडें, रेडी इ. २ आक्टोबर १८१२ मध्यें रेडी व निवती हे दोन किल्ले व शिखडें, आखली हा भाग इंग्रजांच्या ताब्यांत गेला. बदामीचा चालुक्य नृपति मंगलेश याच्या कारकीर्दीत चालुक्यांनी दक्षिण कोकण जिंकून घेतलें. नेरूर ताम्रपटांत म्हटलें आहे कीं मंगलेशाने अठरा युद्धांत विजयी झालेल्या चालुक्यवंशी स्वामीराजाला ठार केले व नंतर आपला नातलग सत्याश्रय ध्रुवराज इंद्रवर्मा याला कोकणचा अधिपति केलें. गोवा ताम्रपटावरून J. B. B. R. A. S. VolX ( Old Series p. p. 365 (सन ६८८–८९) मध्यें रेवती द्विप येथे तो चार प्रांतावर राज्य करीत होता असें कळतें.

रेवती द्विप किंवा रेवती पट्टण किंवा रेडी ह्या स्थळाचा आजगांवशीं प्राचीन संबंध आहे. हें देवस्थान व्यवस्था व चालिरिती यावरून दिसतें. हल्लीं रेडी येथें एक गणपति मूर्ति सांपडली आहे व तेथें देऊळ बांधण्यात आलें आहे. प्राचीन कदंब सत्तेंत हा सर्व भाग समृद्ध होता. हे सत्ताधीश ब्राह्मण होते. समुद्रकिनाऱ्यास त्यांचे फार मोठे आरमारही होतें. रेडीच्या किल्ल्याचें बांधकाम प्राचीन आहे. त्यावर एक शीलालेख असल्याचें कळतें. पुढें छत्रपति शिवाजीमहाराजांच्या काळांत त्याला यशवंत गड म्हणू लागले. याचे नांव गणनगड रेडी येथील किल्ल्या-

नजिक खाली समुद्रांत, सिद्ध महापुरुषाचें देवालय आहे. येथील कुंडांत गोडे पाणी येते. मार्गशिर्ष महिन्यात जेव्हा आजगांवची देव स्वारी निघते तेव्हां आजगांवचा देव रेडी येथील सिद्धास भेटून व त्याच्या चाळ्यास मान देऊन येत असतो. आजगांव देवस्थान विषयक सरकारी नेमणुकींत श्रीसिद्ध रेडी या नावें अल्पशी नेमणूक आहे. रेडी येथील सिद्धाचे पुजारी गोसावी हे आजगांवच्या देवाजवळ दरवर्षी दसऱ्यास येत असतात. त्यांना नैवेद्याचें पान देण्याची वहिवाट आहे. आजगांव ग्रामस्थांपैकी प्रमुख मतकरी कुळाचा पूर्वज श्रीसिद्ध पुरूष याची द्विभुज मूर्ति वेतोबाच्या डाव्या बाजूस देवालयांत प्राचीन काळापासून आहे. ह्या सर्व गोष्टींवरून रेडी किंवा रेवतीद्विपाशीं आजगांवचा संबंध कसा आहे हें सूचित होते.

आजगांव हा अतिशय रम्य गांव आहे. जुन्या रस्त्यांची पहाणी केल्यास ह्या गांवाची समृद्धी ध्यानात येते. वेतोबा व रवळनाथ ह्या देवतांची दोन प्रचंड देवळें ह्या गावांत आहेत. शिवाय महादेवाचे, सर्वेश्वराचें, नारायणाचें, आदिनारायणाचें, परशुरामाचें अशीं किती तरी प्राचीन देवालये आहेत. श्री वेतोबा देवालया समोर एक मोठी तळी असून घाटाच्या पायऱ्या बांधलेल्या आहेत. ह्या देवालया समोर सातेरीची देवी आहे. आजगांव, तिरवडें, शिरवडे, व रेडी गांवाचा परस्पर दैवतांचा संबंध आहे. मानपान आहेत.

आजगांवचें प्रमुख व जागृत ग्राम दैवत श्रीदेव वेतोबाच्या चरणी प्रार्थना करतांना उपयोगी पडेल अशा प्रकारचे हे स्तोत्र सर्वांनाच उपयुक्त वाटेल. भक्तजनांनी त्याचा नित्य उपासनेसाठीं उपयोग करून आपला उत्कर्ष साधावा.

—गुं. फ. आजगांवकर

रामनवमी, दि. ७।४।८७

# श्री देव वेतोबा महात्म्य

श्री गणेशायनमः

श्री सरस्वत्यै नमः

श्री गुरुभ्यौ नमः

श्री सीतारामचंद्राय नमः

श्री देव वेतोबाय नमः

श्री कुलदेवताय नमः

एकात्मता स्तोत्र रुद्राभ्यासीं । देई अत्यानंद मानसीं । शिव घेई नानारुपांसी । भिन्न भिन्न प्रदेशीं ॥ १ ॥ जैसा कैलासींचा कैलासनाथ । जैसा भूतान देशींचा भूतनाथ । जैसा नेपाळींचा पशुपतीनाथ । तैसा आद्यग्रामीं वेतोबा ॥ २ ॥ जैसा नेरुरचा श्री कलेश्वर । बांद्याचा बांदेश्वर । जैसा वाडीचा आत्मेश्वर । ईश्वर वेतोबा आद्यग्रामीं ॥ ३ ॥ देवगडीं श्री कनकेश्वर । गोकर्णीचा महाबळेश्वर । गोमंतकीं मंगेश शंकर । तैसा वेतोबा

आद्यग्रामीं ॥ ४ ॥ सौराष्ट्रींचा सोमनाथ । परळी येथचा वैद्यनाथ । निजामींचा नागनाथ । काशि-विश्वेश्वर काशीचा ॥ ५ ॥ वेरुळचा घृष्णेश्वर । भीमेचा भीमशंकर । सेतूचा रामेश्वर । गौतमींचा त्र्यंबक असे ॥ ६ ॥ हिमाशिखरावरी केदार । नर्मदातीरीं ॐकार अमलेश्वर । उज्जयनीचा महा-कालेश्वर । शैल्यपर्वतीं मल्लिकार्जून ॥ ७ ॥ तैसा आद्यग्रामीं वेताळेश्वर । भक्तां असे अभयकर । जें जें इच्छिलें तें तें देणार । स्थान नाहीं संदेहासी ॥ ८ ॥ प्रयाग राजींचा संवाद । ऐका श्रोते ॐकार नाद । येथें नसे भेदाभेद । सर्व कांही शिव असे ॥ ९ ॥ दक्षप्रजापति आणि नंदी । शाप प्रतिशाप जधीं देती । शिवशंकर नंदितें म्हणती । सर्व कांहीं मीची असें ॥ १० ॥ मीच असें यज्ञ-यज्ञांग । मीच यज्ञात्मा यज्ञकर्मांग । यज्ञ परायण यज-मानांग । यज्ञ बहिष्कृत मीची असें ॥ ११ ॥ वेतोबा असे शिवशक्ती । वेतोबा असे भक्तभर्ता । वेतोबा असे करुणाधिपती । स्मरा वेतोबा दिनरात्र

॥ १२ ॥ ब्रह्मा विष्णु महेश । वाटती तीन परि एक ईश । अनेकीं चित्‌शक्ती विलास। म्हणौनि शिव वेतोबा असे ॥ १३ ॥ आद्यग्राम असे आजगाव। परशुराम क्षेत्रीं महशूर नांव । उभा वेतोबा शंकर देव । वाट पाहे भक्तांची ॥ १४ ॥ आद्यग्राम पूर्वे आरोस । तिरवडे गुळदुवें दक्षिणेस। तळवणें असे आग्नेयेस । शिरवडें असे नैऋत्येसी ॥ १५ ॥ आरवली असे पश्चिमेसी । आसोली ती वायव्येसी मातोंड असे उत्तरेसी । न्हावेली ईशान्येलागीं॥ १६॥ शिरोडा रेडी आरवली । तिरवडें मळेवाड सोनुर्ली । इतर गांवची नात्यांतली । देवदेवता येथ असे ॥ १७ ॥ होई देवदेवतांचें बोलणें । आहे परस्पराशीं भेटणें । ग्रामवासीयांनी तैसें वागणें । असे अपेक्षा देवतांची ॥ १८ ॥ धाव घेई भक्तांसाठीं । निमिषार्धीं धावे जगजेठी । त्या वेताळेश्वराच्या दर्शनासाठीं । या हो तुम्हीं सर्वत्र ॥ १९ ॥ देवा तव गति तीव्र असे । चांद्र शक्ती हातीं असे । मरुताशीं सहचर्य असे । आणि तैसेंची तेजाशीं


॥ २० ॥ वामहातीं अमृत पात्र । भक्तां रक्षिण्या दिनरात्र । दक्षिण हस्ती खड्गशस्त्र । दुष्ट वृत्ती नाशार्थ ॥ २१ ॥ अश्वीन वैद्याशीं तव संबंध । रोगमुक्त करण्या कटिबंध । विश्वकल्याणा तूं सिद्ध । बा देवा वेतोबा ॥ २२ ॥ तव दृष्टि शुभ अशुभावरी । शुभासी साह्य करणारी । अंतीं कल्याण इच्छिणारी । रुद्रगण वेतोबा ॥ २३ ॥ श्री देव वेतोबा पंचायतन । भगवती रवळनाथासी वंदन । रामेश्वर सर्वेश्वरासी नमन । भावें वंदन । पंचायतना ॥ २४ ॥ देव सिद्धासी वंदन । महादेव चामुंडेश्वरीसी वंदन । गणेश परशुरामासी नमन । कुलस्वामी अन् नारायणा ॥ २५ ॥ चैतन्य खेळे सर्वत्र । तदाधारें विश्व अत्रतत्र । परि सर्व असे एक एकत्र । दुजें नसे कांहीही ॥ २६ ॥ म्हणोनि माझा वेतोबा । असे विश्वंभर सदा उभा । करुणापूर्ण दयेचा गाभा । जीवन देण्या सर्वांना ॥ २७ ॥ सकलां भलें इच्छावें । सकला साह्य करावें । सत्कर्मे वागावें रात्रंदिन ॥ २८ ॥ भक्तीसी देव भुकेला ।

भक्ती होई शक्ती सकलां । समर्थ होण्या कार्याला। प्रपंच परमार्थ करण्यार्थ ।। २९ ।। वेतोबा असे ग्रामदेवता।शक्ती रूपें राष्ट्रदेवता। भक्तीरूपें विश्व-देवता । 'ॐ' रूपें सर्वही ॥३०।। सत्वांशें जो वागेल । वेतोबा तया संभाळेल । सत्याचरणा 'ओ' देईल । सत्य सत्य त्रिकाल ।। ३१ ।। बालकें अभ्यास करावा । थोरांचा आशीर्वाद घ्यावा । थोरांनीं आचार मानावा । मानवता धर्म म्हणोनि ।। ३२ ।। माता पिता सेवेसी । वृक्ष वेली रक्षि-ण्यासी । प्राणी दया करण्यासी । तत्पर सदा असावें ।। ३३ ॥ व्यक्त अव्यक्त अनंत । नातें जाणती साधुसंत । ही जाणीव निर्मिती संत । चिदानंदां-सारिखे ।। ३४ ।। जळीं स्थळीं काष्टीं पाषाणीं । असे परमात्मा म्हणे संतवाणी । तैसा शंकर शूल-पाणी । वेतोबा रुपें उभा असे ।। ३५ ॥ तो अभक्तां भक्तकरी । भक्तेच्छा पूर्ण करी । अनंतईश्वर अनंत आकारीं । तैसा विश्वंभर वेतोबा ।। ३६ ।। सत् चिदानंद परमात्मा चैतन्य । तयासी म्हणती

निर्गूण । भक्तांस्तव होई सगूण । जैसा देव वेतोबा ॥३७॥ तो असे सर्वत्र सर्वातीत । तैसाची भक्त देवदेवतांत । भक्ती होई अमाप अनंत । अन्य न राहे कांहीही ॥ ३८ ॥ भक्ती असे त्रिकाल सत्य । भक्ती असे एकरस नित्य । भक्ती असे अनंत । शिव भक्तीरूप वेतोबा ॥ ३९ ॥ मूळ खोड शाखा फळें । नाम रुप वेगवेगळें । एकरस सर्वां मिळे । सर्व मिळोनि एक वृक्ष ॥ ४० ॥ जैसा सूर्य आणि प्रकाश किरण । जैसी साखर आणि गोडी जाण । जैसे पुष्प सुगंध एकपण । रुद्रवेतोबा अभेद असे ॥ ४१ ॥ अनंत परमात्मा एक असे । रुप गुणांनीं वेगळा भासे । शिव वेताळेश्वर वेगळा नसे । वेताळेश्वर शिव उभा ॥ ४२॥ ग्रंथ आजगांव दर्शन । विशेषें करा अवलोकन । ग्राम समाज देव दर्शन गुंफराजें वर्णियलें असे ॥ ४३ ॥ दास गणू विरचित । चिदानंद ओवी चरितामृत । येथीचा महिमा विस्तृत । वर्णियेला तया माजी ॥ ४४ ॥ संकट नाशक वेतोबा स्तवन । जे जे वाचती अर्थ


जाणोन । वेतोबा करी ईच्छा पूर्ण । सद्‌गुरु प्रभु सांगतसे ॥४५॥ इति श्री सद्‌गुरु प्रभु विरचितम् संकट निरसनम् श्री देव वेतोबा स्तवनम् संपूर्णम्

॥ श्री सीतारामचंद्रार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥



तरंग देवता

# श्री देव स्तवन–मुक्तावली



श्रीदेव रवळनाथ, आजगांव